
# निर्वासित

भाऊ विधे

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
क्र. २५३८



REFBK-0024941
REFBK-0024941

संदर्भ काव्य

२५३८

२०९४१

१५।५।८६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

२५३८

ग्र. क्र. २०९४१

काव्य १५।५।८६

ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून
अनुदान मिळाले आहे.

# निर्वासित

REFBK-0024941
REFBK-0024941

कवि
भाऊ विशे



मूल्य १० रुपये

नयना पब्लिकेशन
नौपाडा ठाणे - २

© **भाऊ विशे**

द्वारा– दि. ठाणे जिल्हा मध्यवर्ती
सह. बँक लि.
शाखा– जव्हार जि. ठाणे.

प्रकाशक–
**नयना पब्लिकेशन**
जी ५ नटराज सोसायटी,
नौपाडा–ठाणे ४०० ६०२.

**प्रथमावृत्ती– मार्च १९८६**
**किंमत १० रुपये**

मुखपृष्ठ– **श्री. अरुण ठाकूर**

मुद्रक–
**जे. वी. नाईक,**
वसुंधरा आर्ट प्रिंटर्स,
नागाव–हटाळे, अलिबाग–रायगड.

अर्पण पत्रिका–

जी आयुष्याच्या ऐन उमेदीत मृत्यूचा हात धरुन निघून गेली त्या माझ्या प्रिय पत्नीस कै. सौ. सुनितास – जिच्या कविता तिलाच. —

भाऊ विशे.

# आभार! या साऱ्या सहृदांचं

ज्यांनी सर्वप्रथम माझ्या कविता ऐकल्या, वाचल्या खरी, खोटी पसंतीची साथ दिली ते – श्री. अप्पा काठोळे, सौ. सरिता पाटील (कालिंदी). बिर्लामहाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमूख डॉ. गो. प. कुलकर्णी, प्रा. सौ. नांदुर्डीकर, माझे स्नेही श्री. शरद जोशी, अजित जोशी, संजय प्रभाकर, ॲड. रमेश वेखंडे, पंढरीनाथ वेखंडे, विनायक घानके, प्रा. जयंत ओक, श्री. विलास व कांता कुलकर्णी, नंदू रानडे, प्रा. शंकरराव गोडबोले, संध्या श्रीमाळी, शुभांगी देशमुख, मेधा काबाडी, माझे सर श्री. श्री. न. साळी व सौ. साळी, कविमित्र सुरेश मथूरे, सुधाकर जाधव, प्रा. भगवान जाधव, जव्हार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भा. व्यं. गिरधारी, ज्यांनी मला प्रोत्साहन देऊन माझ्याकडून कविता लिहून घेतल्या ते कालतरंगचे संपादक श्री. दयानंद मुकणे, इंजिनियर श्री. भिसे व सौ. भिसे, श्री अप्पा फणसे, विजय फणसे, जयप्रकाश घोलप, कान्हा थोरात, कु. ज्योति व किरण मुकणे, शुभांगी मुकणे, विजयावाणी, साहित्य संघ जव्हार आणि ज्यांनी माझ्या कविता प्रसिद्ध केल्या ते संपादक – नवशक्ती, लोकप्रभा, अमरेंद्र, हस, सत्यकथा, अस्मितादर्श, प्रतिष्ठान, रविवार मुंबई सकाळ, सा. कालतरंग, ज्यांची नावे नजरचुकीने राहून गेली असतील त्या सर्वांचा मी आभारी आहेच. त्याच बरोबर ज्या माझ्या रसिकांनी माझ्या कविता वाचून मला वेळोवेळी पत्रे लिहून प्रोत्साहन दिले त्या साऱ्यांचा मी आभारी आहे.

ज्यांच्यामुळे मी हे पुस्तक आपल्या हाती देवू शकलो त्या नयना पब्लिकेशन्सच्या सौ. नयना आचार्य यांचे आभार शब्दातीत आहेत.

ऋणात यांच्या :–

माझे अडाणी आई, वडिल ज्यांनी मला लिहिता वाचता येण्याइतके शिकविले.

प्रा. अशोक बागवे. ज्यांनी माझ्या सारख्या सामान्य कविच्या कविता संग्रहाला प्रस्तावना लिहिली.

भाऊ विशे

कवि

द्वारा – दि. ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक, जव्हार

जि. ठाणे

## नयना पब्लिकेशनची संग्राह्य पुस्तके–

नव्या कादंबऱ्या – १) शिकारीण –५२ रु. २) खंडग्रास –३६ रु.

लेखिका :– नयना आचार्य

नवीन पुस्तके

१) परिक्रमा – ले. कृष्णा मेणसे

२) अवशेष (कादंबरी) – ले. सुहास उमराणी

३) निर्वासित १८ रु. – कवि भाऊ विशे

★

## नयना आचार्य लिखित वाचनीय रम्य कादंबऱ्या

| | | | |
|---|---|---|---|
| १) बाप–बेटा व ती | –३२ रु. | २) अजून वेळ गेली नाही | –३४ रु. |
| ३) एक कळी | –२४. रु. | ४) सोन्याची सुरी | –५० रु. |
| ५) बावडी | –३८ रु. | ६) हवाई लग्न | –३२ रु. |
| ७) नरोत्तम | –३५ रु. | ८) शहजादी | –३५ रु. |

★

डॉ. सी. डी. देशमुख यांचे आदर्श चरित्र – १२ रु.

'कृतार्थ जीवन' ले. शंकरराव लुगडे (M. A. B. Ed.)

**'बालकांच्या मेंदूचा क्षयरोग व जलशीर्ष'**

ले. डॉ. पी. एस्. रामाणी (प्रख्यात न्यूरोसर्जन) – ३२ रु.

बालकांना अंधत्व, अपंगत्व, फिटस्, बुद्धिमंदत्व, खुरटेपणा, अशक्तपणा, मेंदूत गाठ येणे इ. रोगांची कारणमीमांसा करून त्यावर उपाय सांगणारे मौलिक शास्त्रीय पुस्तक.

---

लिहा – **नयना पब्लिकेशन**

**५ जी–नटराज सोसायटी, नौपाडा, ठाणे २**

# माझी माती

मराठी ग्रंथ संग्रहालय

माझ्या मातीतून येतो
गुलाब कळ्यांचा सुवास
माझ्या रानातून वहातो
वारा टाकीत नि:श्वास

माझ्या आभाळी दाटती
इंद्रधनुष्याचे रंग
माझी पाखरे गातात
थोर संतांचे अभंग

माझ्या चांदभऱ्या राती
आणती स्वप्नांना आकार
माझ्या उमलत्या पहाटे
सत्य होतसे साकार

माझ्या सूर्याचा प्रकाश
दाटे आभाळ भरून
माझ्या देहातून यावा
असा एखादा किरण

# मरण ओझे

तोडूनी बंधनाती चालत मी राहिलो
बहर आला रानाला झडत मी राहिलो

सूर्य नसून माथ्यावर जळत मी राहिलो
बाभूळ बनात काटयांशी खेळत मी राहिलो

ओठावरच्या शब्दांना रेटत मी राहिलो
दिन-रात स्वत:शीच फुटत मी राहिलो

जे भेटले पूंड त्यांना पूजित मी राहिलो
जे भेटले षंढ त्यांना जोजवित मी राहिलो

मनातल्या भावनांना कुजवित मी राहिलो
पराभवाचे चौघडे वाजवित मी राहिलो

वेदनेच्या असीमकळा जागवित मी राहिलो
जगण्याचे मरण ओझे वागवित मी राहिलो

# समर्थ

ज्यांचे सूर्योदय सूर्यास्त आधीच ठरलेले असतात
त्यांची सगळीच उत्तरे बिनचूक असतात

ते अंधारातही वाचतात दुसऱ्यांची भविष्ये
आणि नुसत्या स्पर्शाने सांगतात नाण्याची किंमत

ते बोलू शकतात अधिकारवाणीने कवितेवर
त्यांचे डोळे समर्थ असतात सूर्यासारखे

ते पेरतात सुरूंग, फोडतात तुरूंग
आणि सोडतात पांढरीशुभ्र कबुतरे वाऱ्यावर

कारण....
त्यांचे सूर्योदय सूर्यास्त आधीच ठरलेले असतात.

*

# अखेर

खारीच्या पावलांनी येणारी ही संध्याकाळ
कपाशिच्या बोंडाबोंडातून फुलणारा कापूस
तसे केस भुरभुरतात;
बत्तीस दात वाळूत मिसळलेले.
वाऱ्याच्या साध्या झुळकीने थरथरतो देह
झाडाच्या पानांसारखा
अंधारावर पावले टाकीत सुरु होतो अज्ञाताचा प्रवास.
वाऱ्याच्या दिशा आधीच ठरलेल्या असतात.
काळजावर कोरलेली एक एक आठवण
पराभूत योद्धयासारखी
वळणावळणावर सुटत जाते.
चर्चमधील सायं घंटा वाजू लागतात काना-मनात
एक घोडा खुरडत खुरडत दूर निघून जातो;
त्याच्या टापांचे आवाज पहाडातून येत राहातात.
तेंव्हा थांबलेल्या असतात चर्चमधील प्रार्थना
आणि कोसळत राहातो पाऊस धुंवाँधार.

❋

# उध्वस्त किनारे

उध्वस्त किनाऱ्यावर मी एकटाच असा
समोर खवळलेला महासागर अंधारलेल्या दिशा.

मनात करपलेल्या बागा, अडलेले श्वास निश्वास
कानात वाजणारा समुद्र डोळ्यात मृत्यूचा पाऊस

किनारे उध्वस्त झालेले पाय दलदलीत अडलेले
माझ्याच माणसांनी घाव पाठीवर केलेले

अशा वेळी कुठली वीज माझ्यातून पेटते
आणि सारा आसमंत उजळून टाकते.

*

## आठवणी

आयुष्याची शिवण उसवली जाते.
एक एक आठवण परकी होऊन येते.

आठवणींचा नाग फणा उभारून राहतो.
माझाच मला मी दूरस्थासारखा पहातो.

हे घर, हे शेत, हे प्रेम माझे नाही माझे नाही
कोणाचे हे शरीर ? जखमेबरोबर वहात राही

हा सूर्य, तो चंद्र, ते तारे सदा अंधारलेले सारे
येतात कुठून हे खिन्न स्वर आणि गढुळलेले वारे ?

आळसावलेली दुपार, उष्टावलेली संध्याकाळ
विधवेसारखी रात्र आणि असहाय्य सकाळ

उसवलेल्या शिवणीसारखं उसवलेलं आकाश
आणि आठवणींसारखा अंधुक होत गेलेला प्रकाश.

# बंदिवान

तुला केव्हाच बंदिवान केलंय मी
माझ्या अश्रूंच्या बंदिखान्यात.

तुला जाता येणार नाही माझ्या अश्रूंच्या साखळ्या तोडून
अश्रु दुबळे असतात म्हणून हसला होतास तू

पण... माझे अश्रु कधीच दुबळे नव्हते; नाहीत.
ज्या अश्रूंनी एका चक्रीवादळाला आपल्या किनाऱ्यावर

थोपवून धरलंय ते दुबळे कसे असतील?
अश्रूंचे मोल कळायला कुणीतरी रक्ताच्या शपथेनं
बांधायला हवंय.

आता मला जगण्यासाठी पुरे आहेत तुझे स्नेहाळं डोळे.
आणि तुझ्या वारा भरलेल्या हातांचा स्पर्श

तुला बंदिवान करता करता मीच बंदिवान झालेय रे
तुझ्या बागेतील बकुळेसारखी.

*

# वणवा

तुझ्यासाठी उगवलेल्या सूर्याची शपथ
मी केव्हाच निघून गेलोय तुझ्या मार्गावरून,

निसटलेल्या रात्री सारखा.
आणि माझ्या समोर पसरलंय

माझं भणंग एकाकी आयुष्य न दिसणाऱ्या भूतासारखं
आता मी माझ्या पांगळ्या पायांनी ठोकरतोय माझे

निर्लज्ज पराभव आणि माझ्या आंधळ्या डोळ्यांनी
ओरबाडतोय मी तुझं अनंत वैभव

माझ्या अश्रूंनी बांधलय माझं घर उन्हात
आणि पेटलाय वणवा माझ्या विझल्या रक्तात.

# निराधार क्षितिजे

निराधार आभाळासारखा मी बसलोय
माझ्या अनंत दुःखांसह

सूर्य, चंद्रासारखं एकही लेणं
माझ्या दुःखांना लाभलं नाही.

मला पहावे लागतात माझ्या दुःखांचे उल्कापात
आणि समुद्रात खोलवर बुडत चाललेली

माझी निराधार क्षितिजे.
आता समुद्रच उतरु लागलाय माझ्या रक्तात

आणि मला सावरण्यासाठी सरसावलेत
वेदनांचे हजारो हात.

# उद्याच्या सूर्यासाठी

तुझ्या घणाघाती शब्दांचे पहाडी प्रदेश
मी केव्हाच पार करुन आलोय ह्या वैराण वाळवंटात.

माझा घोडा चिरनिद्रा घेतोय
इथल्या कातळकाळ्या कपरीत

माझ्या पायातून रक्त ठिबकतंय
समोरचं भावविश्व समूळ हादरतंय

तू अडवून ठेव पाण्याचे सगळे प्रवाह तुझ्या पहाडी
प्रदेशात.
मी नाकारली आहे संभावितांची पोकळ सहानुभूती

आणि चंद्राच्या शितल प्रकाशात ठेवून दिला आहे.
माझ्या अस्थिचा कापूर उद्याच्या सूर्यासाठी.

*

# झाड

इथे झाडांच्या गर्द वनराईत
तुझ्या आठवणींचा पाऊस मनमुराद कोसळतोय.

तुझ्या नाजूक हातांचा ओझरता स्पर्श 'दिल की दुनिया'
हेलावून गेला होता.
तुझ्या पदराभोवती गुरफटले गेले होते माझे पर्जन्य वारे.

असे विशाल डोळे पाहिले नव्हते.
मी गुदमरलो होतो तुझ्या श्वास निश्वासात

कसे असते प्रेम ?
उत्तर नाही.

कसा कोसळतो आठवणींचा पाऊस ?
उत्तर नाही.

मला आवरता येत नाही हा उधळलेला घोडा.
आणि थांबवता येत नाही हा कोसळणारा पाऊस.

आता मी झालोय ह्या वनराईतील एक झाड,
पावसात मुकाट भिजणारं.

# वरात

आज माझ्या आसवांची गाली वरात आली.
आज त्या दिव्य प्रीतीची काजळी रात आली

चूर मी दुःखात माझ्या हुंदका आहे उरी
आज माझ्या ओठावरी आतली बात आली.

सोडूनी जे सर्व गेले ते सुखांचे सोबती
आज माझ्या सोबतीला वेदनेची साथ आली.

सांगतो तुलाच सारे ऐकूनी घे एकदा
आज माझ्या कोठारात पेटती वात आली.

अखेरच्या माझ्या हाका ऐकणार ना सखे ?
वसंतात माझ्या दारी ही बरसात आली.

चांदणे पेरू नको तू डोळ्यांतूनी आता तुझ्या.
आज माझ्या आसवांची वेगळी जात आली.

# घोडे

तसे घोडयांचे बरे असते
त्यांना टापांचे आवाज करीत कुठेही जाता येते.

अगदी कवितेतही घोडे उधळतात.
पहाडातून, मोकळचा मैदानातून, हिरव्या कुरणातून.

घोडे जय-पराजयावर चर्चा करीत नाहीत.
आपल्या पाठीवरचा स्वार कोसळला की,

ते कलेवराचं राखण करीत राहतात इमानीपणे
किंवा परततात रिकामा खोगीर घेऊन घराकडे;

अथवा विजयी वीराला पाठीवर घेवून
खिकाळतात हर्षभराने. घोडयांना हंटरने मारले जाते

आणि घोडयावरूनही हंटरने मारले जाते.
अखेर हंटर आणि घोडा

ज्याचा त्याचा तेज असावा.
घोडयांना डोळयांना झाकणं लावून

टांग्यालाही चालता येते.
तसे घोडयांचे बरेच असते,

त्यांचे पाय भाजू नयेत
किंवा ते रस्त्यावर घसरून पडू नयेत

म्हणून त्यांच्या पायांना नालही ठोकले जातात.
घोड्यांना झोपायला जागा लागतेच असे नाही

कारण : त्यांना उभ्यानेही झोपता येते,
घोड्यांचे बरे असते

स्वार आरूढ होण्यापूर्वी पाठीवर थाप ठोकतो
घोड्याला थरारून उठता येते.

# पहारे

दिवाभितांसारखे डोळे वळचणीला
बसून असतात आजकाल
अजून पहारे उठले नाहीत मनाच्या आसपासचे
वाटावाटांवर संगिनी रोखून उभे आहेत गारदी

पुढे पाऊलवाटांनी निघून गेलेला बंदिस्त काळोख
शेवटची प्रार्थना मंदिरे डोळयांना दिसलीच नाहीत.
फक्त जिहाद पुकारला रक्तातील पेशिंनी
चांदण्याच्या प्रच्छन्न

रस्त्यावरुन ओघळून जाण्यासाठी.
त्या नंतर सगळयाच झाडांचे बहर ओसरुन गेले
आणि पाखरांच्या वस्त्या उजाड झाल्या.

अजूनही मनाच्या आसपास पहारे तसेच
आणि गारदी संगिनी रोखून उभेच.

# शाप

डार्लींग, तुझी आठवण येत नाही
असा क्षण जात नाही
तूं भरुन उरली आहेस माझ्या गात्रा-गात्रात
तुझे अस्तित्व स्वीकारताही येत नाही
नाकारताही येत नाही एवढे प्रचंड

डार्लींग, तुझ्या आठवणी सूर्यासारख्या
उगवतात असह्य होत जातात.
फुले फुलतात कशी ? आठवणी येतात कशा ?
वादळात, वाऱ्यात, पावसात
झाडे जपतात आपल्या पानांना

तशाच मी जपल्या आहेत आपल्या आठवणी
शिशिर झाडांना शाप की वरदान ?
झाडांना आपले रंग बदलता येतात.
त्यांना विसरता येत असेल झडलेल्या पानांना
मी किती विसरायचं ? किती आठवायचं ?
सारंच असह्य होत चाललंय.

वणवा रक्तात पेटतो.
कातडीच्या आतील शरीराची राख
घेऊन मी चालत राहातो.
तुला माझ्या आठवणी येतात का ?
तुझे होकार, तुझे नकार कसे कळणार मला ?
तू सोयिस्कर विसरशील सगळेच.
पण मला आठवणींचा शाप आहे.
मी चालतोय ती पावले माझी नाहीत.
मी बोलतोय ते शब्दही माझे नाहीत.
इथे मीच माझा नाही,
आता तू माझी हो असं कसं म्हणू ?
या पुढे मी तुझ्या आठवणींत जगणार
आठवणीतच मरणार
मरणार. जगणार.
पाऊस विचित्र असतो डार्लींग
केव्हाही येतो. केव्हाही जातो.

*

# संदर्भ

संदर्भ असतात तपासायचे.
किंवा संदर्भहीन असते जगायचे.
म्हणजे पाऊस आला काय गेला काय
त्याचा संबंध असतो कुठे अश्रूंशी ?
अश्रू तर असतात स्वतंत्र,
आभाळ भरारी घेणाऱ्या गरुड पक्ष्या सारखे
अथवा मातीतून फुटणाऱ्या अंकुरासारखे स्वयंभू
तेव्हा माझ्या डोळ्यात आभाळ दाटून
आल्यासारखं तुला का वाटावं ?
माझ्या आत मी कुठेच खंदक खणलेले नाहीत
दुखाचे किंवा लावला नाही चंदनाचा मळा -
जो बहरू पहातोय, कोमेजू पहातोय
ही एक संध्याकाळची मावळती करूण धून
माझ्या रक्तातून उतरून आलेय थेट डोळ्यात
कशा कशाचे संदर्भ तपासून पहाणार आहेस तू ?
खरंच आता डोळ्यात इवलंही पाखरू नाही
जे तुझ्याकडे झेपावू पहातंय असं

## नववधू

तुझ्या गोऱ्या कांतिवर
ओला हळदीचा रंग
हिरव्या पैठणीत किती
सांग झाकशील अंग

तुझ्या तळहाती झाली
लाल लाजूनिया मेंदी
तुझ्या डोळ्यातील पक्षी
कोऱ्या राजसाचे बंदी

तू चालशी तालात
रूणझुणती पैंजण
तुझ्या हसण्याला भुले
शुभ्र आभाळी चांदणं

तुझ्या गोऱ्या कांतिवर
ओला हलदीचा रंग
आपुल्याच डोळ्यांपासून
कसे झाकशील अंग



मराठी ग्रंथ संग्रहालय ठा
२५३८

# माघार

आजवर शब्दांना शपथा घालीत आलो
ओठातल्या ओठात राहण्यासाठी

आजवर डोळ्यांना दटावीत आलो
रस्त्यांतून चालताना पायाकडे पहाण्यासाठी

पण आता ओठच शब्द पेलण्यास असमर्थ ठरत असताना
आणि पावले माघार घेत असताना

डोळ्यांना दटावण्यात काय हंशील ?
प्राक्तन बदलण्याचा अट्टाहास खूप केला मी.

पराभवावर मात केल्यानंतर कित्येकदा स्वत:चीच
पाठ थोपटून घेतली मी.

पण आता पाठच नाकारते आहे शाबासकिची थाप
सगळेच अनर्थ ओढवल्या नंतर
मी अर्थासाठी हटून बसू काय ?
माझ्या पावलांनी नाकारलेल्या वाटाशोधीत
मी निघालो आहे माघारी.

## फुलपिसारा

जाणारे जातात आपल्या प्राजक्त आठवणी मागे ठेवून
वादळात मोडून पडलेल्या उध्वस्त घरासारखे आपण
पडून राहतो त्यांच्या आठवणीत.

ही सायंकालीन वेळा आपल्या हाती ठेवीत जातो
निर्माल्य झालेल्या फुलांच्या निकामी पाकळ्या
जाणाऱ्यांच्या आठवणीत प्राजक्त फुलपिसारा
झटकीत राहातो सैरभैर होऊन

कोणीच देत नाही उरलेल्या व्यथांना
आपल्या समर्थ हातांचा आधार
फक्त उदास डोळ्यांपुढे अंधार कोसळत राहतो
आषाढ सरींसारखा.

जाणाऱ्याच्या आठवणीत प्राजक्त
फुलपिसारा झटकीत राहतो.

# निर्वासित

निर्वासित छावणी सोडून निघून जावेत
तशी पाखरे निघून गेली आहेत रान सोडून.

अनोळखी माणसाचा अपघाती मृत्यू
आपण जितक्या सहजपणे विसरतो तितक्याच सहजपणे
झाडे विसरली आहेत दूरदेशी गेलेल्या पाखरांना.

कदाचित झाडांना असतील भविष्याचे डोळे
किंवा पाखरांनी केला असेल झाडांशी अलिखीत करार;
पावसाळ्यापूर्वी परतण्याचा.

आपण काहीच नाकारू शकत नाही.
कारण : इथे आपणही निर्वासितच.
आपला संबंध सावलीपुरताच मर्यादित.

पण आपण जाण्याआधी पक्षी परतले तर
झाडांची प्रतिक्रिया कळू शकेल इतकेच.

*

## अश्रू

१

मला ऐकू येताहेत तुझ्या हाका
लव्हबर्डस् –
पक्षी पिंजऱ्यात कोंडण्याचे मी केव्हाच सोडून दिले आहे.
आंता वादळात मी बेघर होईन तेव्हा तुझ्या मोकळ्या
आभाळात मला आश्रय दे.

२

तू ढगांसारखी दुरूनच निघून गेलीस
तेव्हापासून चंद्रोदयाच्या वेळा मला दिसल्याच नाहीत.

पुढे तुझ्या कोसळण्याची तार आली
आणि मी अंधारात मिसळून गेलो,
तुझ्यातील वीज माझ्यावर कोसळावी म्हणून

३

अजून खूप आवराआवर करायची होती
आणि तू निघून गेलीस –
कुणालाही काहीही न सांगता
सगळा पसारा तसाच पडलेला.

शिशिरात रानात पडलेल्या पाचोळ्यासारखा.
आता साधी ठिणगी पडली तरीही हे आयुष्य पेटून जाईल

४

परतीच्या वाटेवर झाडांना ओळखीच्या खुणा विचारू नकोस
ती फुलून उभी असतील.
त्यांच्याकडून फुलण्याचे शिकून ये,
तुझ्या स्वागतासाठी मी अश्रू पेरून ठेवले आहेत
तुझ्या वाटेवर
पाय ठेवण्यापूर्वी तेवढे पाहून घे.

# संध्याकाळ

ही अखेरची संध्याकाळ
इथून पुढे फुलांचे मलूल म्लान चेहेरे पहायचे नाहीत.
सूर्य मावळताना डोळ्यात पाणी आणायचे नाही.

रिकाम्या घरट्याला लागू द्यायची नाही
चाहूल, पक्षी परागंदा झाल्याची.
घरटे तसेच वाट पहात राहील. काळोखात उसासत राहील.

सगळे मनाच्या तळाशी कुजू द्यायचे.
मात्र आपले मलीन फाटके आयुष्य
दुर्लक्षित करून जगायचे नाही.
फक्त ही एवढी संध्याकाळ आपली
म्हणून अखेरचा सूर्य ढळू द्यायचा क्षितिजाखाली.

पक्ष्यांचा चिवचिवाट कानाआड करून
कोमेजलेल्या फुलांना अखेरची श्रद्धांजली वहायची
आपला अस्त होताना क्षितिजाच्या कडा
पाणवणार नाहीत याची दक्षता घ्यायची.

# पक्षी

प्रत्येकाच्या डोळ्यात सोनेरी स्वप्ने तरळत असतात.
सर्व स्वप्नांचा एक पक्षी तरंगत असतो क्षितिजापाशी.
तसे जपण्यासारखे पुष्कळ असते आयुष्यात.

पण प्रत्येक क्षण मातिमोल होत जातो.
आणि पापण्यांच्या आतील स्वप्नांची
राख जपत बसावे लागते उगाचच.
संध्याकाळची चाहूल लागली की,
स्वप्न पक्ष्यांचे पंख थरथरू लागतात.

अदृश्य धुके नजरेसमोर दाटत राहाते.
प्रयत्नपूर्वक जपावा लागतो थोडाफार प्रकाश.
आणि अेका वळणावर
सारेच पुसून जाते डोळ्यां समोरून.

फक्त सोनेरी स्वप्नांचा पक्षी उडून जातो
पिजऱ्यातून . . . कुठे जातो ?

# रानाची स्वप्ने

रखरख उन्हात आंब्याची डहाळी
वाकून उभी मोहोरांच्या भारानं
आणि सर्वत्र उभी निष्पर्ण झाडे नग्न उन्हात.
नव्या नवरीसारखी सजून एखादी जांभूळ.
हिरवा चुडा, हळदी अंग, हिरव्या पदरात मुग्ध.
कुठे कुळे धगधगते पळस, पांगिरे आणि करवंदीच्या जाळीत
करवंदी फुलांवर लोभावलेले चुकार रानपक्षी.
हे रान मी अलिप्तपणे न्याहाळतो.
जसा वारा बाभळीच्या झाडाला
स्पर्श न करताच निघून जातो
झाडांच्या सुगीचे दिवस हाकेच्या अंतरावर आहेत.
माझ्या . . . . ?
मीही पहातोय रानाची स्वप्ने
शिशिर संध्याकाळची
वसंतागमनाच्या पहाटेची
करवंदीच्या पांढऱ्याशुभ्र फुलांची.
आणि माझ्यावर लोभावणाऱ्या दोन चुकार डोळ्यांची.

*

# क्षितिजे

ती म्हणाली :–
'मला क्षितिजे माहीत नाहीत'
माझ्या डोळ्यात कसा कुणास ठाऊक
तिला अविश्वास दिसला
तिने आपले ओठ हलकेच माझ्या हातांवर टेकले
आणि छातीवरून घरंगळणारा पदर हाताने सावरला.

त्या नंतर ती म्हणाली :–
'क्षितिजे सगळ्यांनाच असतात रे'
आणि पराभूत योद्धयासारखी मान खाली घालून
ती निघून गेली.

## तू–

आजुबाजूला वाजणारा समुद्र
त्याची सर्वव्यापी गाज.
मी समुद्र साठवीत उभा
माझ्या असंमंजस डोळ्यात.
अेक गल्बत माझ्याही मनात
हेलकावणारे तुझ्या राजसरूपाचे.

मी उसळत लाटांसारखा आणि तूं किनाऱ्यावर
सरूच्या झाडासारखी सळसळत अपराजित.
माझे तुला स्पर्श करण्याचे सर्व प्रयत्न
भरती आहोटीत असफल.

मी चंद्र प्रकाशात नव्याने उधाणत.
तू हिरव्या मख्मली पाचूंचं राजवस्त्र लपेटून
तारूण्यभारानं विनम्र, थरथरत अधोवदन.

मी निग्रहपूर्वक स्वतःला आत लपेटून घेत समंजस.
पुन्हा पुन्हा हे असेच. मी स्वैर, बेलगाम.
तू रेषेच्या आत सर्वस्व सावरून.

*

# एक कविता

एक संपूर्ण कविता तुझ्या डोळ्यातून
उतरत असते माझ्या मनाच्या कोऱ्या कागदावर.

तुझ्या पापण्या मिटतात झुकतात
आणि कविता शोधीत राहाते व्यथेची वळणे.

तू कांहीही न बोलता मुग्ध
तेव्हा कविता कोसळत राहाते

तुझ्या अशब्द ओठातून माझ्या डोळ्यात.
माझ्या आयुष्याच्या सर्गासर्गावर

तुझ्या ओठांच्या स्पष्ट खुणा जागोजाग.
तुझ्या दाट हातांचा आश्वासक स्पर्श

कवितेचा शब्दन् शब्द माझ्या मस्तकात पेरित राहातो.
एक संपूर्ण कविता तुझ्यासह माझीच.

# तुझ्या बंद दारापुढे

एखाद्या झाडाचा लळा लागल्यानंतर
पाखरेही सोडून जात नाहीत झाडाला.
ती विसाव्यासाठी परततातच झाडाकडे.

तू म्हणत्येस 'मला विसरून जा'
पण आता खरेच तुला मी विसरू शकणार आहे ?
आठवणींचा शाप पाठीवर घेऊन.

असेच जगावे लागणार यापुढे मला.
दिवा विझून गेल्यानंतर डोळे अंधारालाही सरावतात,
माझ्या वाटेवरचा प्रकाश तू हिरावून घेतला आहेस.

तरीही या अंधारात मी तुझ्या पावलांच्या खुणा
शोधित येईन तिथे ---
जिथे तुझ्या घराचे दरवाजे माझ्यासाठी बंद असतील.

सहज शक्यतेनुसार झाडे आश्रय देतील पाखरांना
रातझडीचा पाऊस सुरु झाल्यानंतर
तेंव्हा मी उघड्या आभाळाखाली
तुझ्या बंद दारापुढे....

*

# पाखरू

चार क्षणाचे आयुष्य
त्यातील दोन क्षण तुझ्या डोळ्यात सामावले.
आणि माझ्या मनाचे पाखरू तुझ्या निरागस
चेहेऱ्यावरून हळुवारपणे निघून, गेले.

पुढे कुठेच बाग नाही.
कुठेच हिरवे रान नाही.
पाखरूच रान होऊन स्वतःशीच झडत गेले.
तुझे सर्वस्व तुझ्या न कळत माझ्या आत माझेच झाले.

तेव्हापासून माझे डोळे तुझ्या डोळ्यात गुंतून आहेत.
मी नुसताच बसून आहे.
पुढे सुन्न काळोख ... आणि त्या पुढे ...
तुझ्या डोळ्यातून उडून गेलेली अगणित फुलपाखरे.

# अनोळखी प्रदेशात

एखादया अनोळखी प्रदेशातून चालताना
पावले बिचकतात.

घनघोर परकेपण समोर कोसळत राहाते.
तसे काहीच ठरलेले नसते.

जसे प्रेमातील रुसवे, फुगवे.
प्रेमभंगातील सावध सूड.

फक्त डोळयात उतरत राहातो गळाभर अंधार.
एखादा अनोळखी प्रदेश
आपला होण्याआधी आपण कोणाचेच नसतो.

अगदी निवडुंगाच्या काटयासारखे आपण कुठेतरी
वाढलेले असतो एखादया अनोळखी रानात.

*

# कारणे

झाडाच्या झुकण्याची दोन कारणे
मला माहीत आहेत.

अेक: झाड पूर्ण बहरात झुकते.
अथवा:

झाड उताराकडे झुकते.
मी बहरात नाही.

उताराकडेही नाही.
माझ्या झुकण्याची कारणे सांगशील कां ?

# मी काय करू ?

मागील पानावरच्या तुझ्या सगळ्याच
कविता मला पाठ आहेत.
त्या नंतरची पुढची पाने कोरीच आहेत.

मध्येच एका पानावर तू लिहिलेल्या मधुचंद्राच्या
कविताही मला पाठ आहेत.

तसेच तुझ्या रानदांडग्या पतीच्या डोळ्यातील कथा
आणि तुझ्या व्यथाही मला पाठ आहेत.

पण मी काय करू ?
चार चौघात मला यातील काहीच सांगता येत नाही.

म्हणून मी तुझ्या वहितील कोरी पानेच जवळ बाळगून आहे
त्याला मी काय करू ?

# दैन्य संपून

दैन्य संपून दिवस सुखासीन होतील ह्या आशेवरच
गुलमोहर फुलत राहातो.
सूर्य सान्निध्यात येणाऱ्या सावल्या कुठल्याही क्षणी
पाठ फिरवून निघून जातात.

शाश्वत सत्त्याला सामोरे जाताना आधी खिसे चाचपून
नंतरच ऑर्डर द्यावी लागते एक कप चालू चहाची,
मोर्चे निघतात कोणी कोणावर तरी अन्याय केला म्हणूनच
उसळतात दंगली, उठतात आगडोंब शहरभर.

नंतर सोय केली जाते एखादया निवृत्त न्यायाधिशाच्या
पोटापाण्याची. दंगलीची न्यायालयीन चौकशी करण्यासाठी.
दिवस थकून थकून जातात.
प्रत्येक रेल्वे स्टेशन उभे असते गाडयांची वाट पहात.

अेक जंगली जनावर स्वत:चाच चेहेरा ओरबाडतंय,
शहराच्या ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत.
सर्वत्र भकास जळणारी सिग्रेटची थोटके आणि
त्यांची राख कोणाच्यातरी पावलांखाली.
दैन्य संपून दिवस सुखासीन होता होता
गुलमोहोर स्वत:च झडून जातो.

# पाऊस

(१)

दूरच्या प्रवासाहून थकून आलेला पांथस्थ जसा
बेहोषपणे झोकून देतो स्वतःच्या
झाडाच्या सावलीत तसाच हा
पाऊस मुळासकट उन्मळून पडणाऱ्या झाडासारखा कोसळत
राहातो. ही सुरुवात असते पुढच्या निरागस निर्झरांची.

(२)

पाखरांनी नुकतीच पूर्ण केलेली असतात आपल्या
घरटयांची कामे आणि इतक्यात येतात
राक्षसी मान्सून वारे.
पानांनी गच्च भरलेल्या झाडांना उभे आडवे झोडपित.
पहाता पहाता जमा होतात शत्रू सैन्यासारख्या ढगांच्या
पलटणी स्वच्छ निळया नभात सुरू होतो ज्येष्ठाचा पाऊस
पाखरांची घरटी मुळापासून हादरतात.

( ३ )

रखरखत्या पाऊल वाटांवर चालू लागतात अल्पायुषि निर्झर
दोन्ही बाजूंनी हिरव्यागार गवतपाती उत्सुक
नजरेने पहाणाऱ्या बालकांसारखी खुदखुदत असतात.
हा पाऊस सगळ्या स्वप्नांचे तुकडे जमवीत गोळा होतो
शेतकऱ्यांच्या डोळ्यात.
त्यापुढे सुरू होते चिखल मातीचे आणि पावसाचे नाते
सगळी शेंते भरून जातात पाण्याने – दाण्याने.

# कशासाठी ?

मी रणवण भटकतोय, उन्हा-तान्हातून
माझ्या मणक्यांची रुद्राक्षमाळ
कधी तुटेल ते सांगता येत नाही.

घोडयांच्या टापांचे आवाज दूरदूर चालले आहेत.
कुठल्या सुजाणरानातील निर्जन वाटा तुडवतोय मी ?

अेक प्रचंड अरण्य माझ्यासमोरून नष्ट होतं चाललंय.
डोळयात कुठेही हिरवेपण नाही.

हृदयात फक्त अनामिक स्पंदने.
हा प्रदेश बेचिराख करुन कोणीतरी माझ्या कपाळी
उदी लावली आहे निनावी.

मी क्षणा क्षणाला माझ्यापासून दूर चाललोय.
मी कुठे चाललो आहे ? कशासाठी ?

*

# सखा

सखा जीवाचा भेटला
उरी डोंगर पेटला
किती दिसांनी राजसा
श्वास श्वासात मिटला.

आलं आभाळी चांदणं
आता काळोख कुठला
त्यात दर्याला उधाण
फेस लाटात फुटला.

गेल्या दिसांचा सगळ्या
आज हिशेब मिटला
तुझ्या राकट हातांनी
माझा खजिना लुटला.

माझ्या भरल्या रानात
तुझा सुवास दाटला.
आता थांबरे थांबना
पहा पदर फाटला.

## इतकेंच सांग

ऐकले होते तू माझ्या आठवणीत अश्रू ढाळते आहेस म्हणून
खूप खूप थकले आहेत तुझे डोळे माझ्या वाटेवर.
म्हणूनच मी आलो.

पण.....
तुझे डोळे माझी ओळख विसरले होते आणि
माझे डोळे पूर्ण भरुन आले होते आषाढ मेघांसारखे.

तूं तीच होतीस, मीही तोच होतो.
सारे काही तेच होते.
तरीही आपण अनोळखी झालो होतो.

मी परतताना तू दरवाजात आलीस;
ती मला निरोप देण्यासाठी की,
दरवाजा बंद करण्यासाठी इतकेच सांग !

*

# आसूड

आता खुशाल ओढा आमुच्या आसूड पाठी
डोळयात आसवांची होणार कधी न दाटी

तेव्हा तुमच्या हिशेबी आम्ही कुठेच नव्हतो
आता जमून आल्या आपल्या समोर भेटी.

तेंव्हा हसून जगलो खाऊनी घास उष्टे
आता असूनी ताट उठतो उपाशी पोटी.

तुम्ही आहात दर्दी आम्ही आहोत कैदी
तुम्ही उगारलेली आम्ही धरु ना काठी

आम्ही असून काही इथे उपाय नाही
आम्ही फिरता उपाशी तुम्हास तूपरोटी

तुम्ही समर्थ शक्ती आम्ही गुलाम बंदे
तुमचे हजार धंदे आमच्या हाती करोटी.

तुमची अचूक खेळी जिंकून डाव जाते
आम्ही असून हिरे ठरलोत गारगोटी

आता नको प्रतिक्षा करा तुम्ही इषारे
आणि खुशाल ओढा आमुच्या आसूड पाठी.

# शोध

तुझ्या मिठीत चंद्र उगवला होता
तेव्हा रात्र अशीच होती रान फुलांनी डवरलेली
धपापत्या हृदयांना श्वासांचा अर्थ सांगणारी.
आणि झाडांच्या सावल्या घट्ट बिलगून होत्या अेकमेकांना,

शरीराची सूक्ष्म कंपने लपवीत तू तुझा विजयी वारू
दौडीत निघून गेलीस ह्या रस्त्यावरून भरधाव
तेव्हाही रात्र अशीच होती.
गलबलून आलेली थरथरत्या हिमलाटांची
आणि चंद्र नुकताच मिटत होता
क्षितिजाची चादर डोळयावर घेवून.

आता ह्या काळोखात झाडांच्या सावल्या
विलग झाल्या आहेत की एकमेकात गुंतून गेल्या आहेत
याचा शोध घेत मी थांबलो आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र.
शाखा (स्थळ

# किनारा

अंग अंग भिजून जाईल
असा संध्याकाळचा किनारा
मी ठेवलाय जपून माझ्या आत

तिथे आलेले पक्षी
कधीच परतणार नाहीत कुठल्याही रानात;
असे श्वासांचे हिंदोळे ठेवले आहेत

झाडांच्या डहाळ्या डहाळ्यांवर
आता फक्त तुझ्या उमलण्याचा अवकाश की,
टपटपणारी फुले ह्या प्रवाहावर
मिरवत मिरवत जातील

जिथे निर्माल्य भेटते वेलींना तिथे
त्या नंतर उरेल तो किनारा आपला असेल
तुझा - माझा असेल
त्या आधी तूं उमलून ये.

*

# तुझे डोळे

तुझे नितळ गहिरे डोळे
आणि त्यात दाटून आलेली अपरंपार प्रीती
किती सहज असतो तुझा आग्रह
बस नारे, चहा तरी घे,
निदान साखरपाणी तरी–

शब्दातून साखर पेरणी करतेस
वर साखर पाण्याचा आग्रह.
खळखळून हसणं हे तुझं अखेरचं अस्त्र.
मग मी विरघळत जातो तुझ्या डोळयात.

एकदा असंच खूप उशिरापर्यंत थांबलो तुझ्या घरी
असंच काही बाही बोलत; तर दारी अंधार दाटलेला
नंतर तूं मला कंदील घेऊन रस्त्यापर्यंत सोबत केलीस

म्हणालीस, "जाशील की कंदील हवाय?"
मनात म्हटलं देणार असशील तर तुझे डोळेच दे.
म्हणजे डोळयांच्या सोबत तूही येशिल.
पण ते मनातच
आणि उगाचच.

# रिक्त

तुझ्या गावाहून रिक्त हस्ते परतलो.
मनात लाख वादळे घेवून

कधी ? काहीच आठवत नाहीं.
खूप दिवस झाले नक्कीच !

आता असेच भेटायचे
क्षणकाळ....

आणि तुटायचे
चिरकाळ.....

चांदणे हंबरते रात्री कोणासाठी ?
फक्त उदास अेकांत कूस बदलीत राहातो.

सर्व फुलांचे बहर दारावरून निघून जातात.
अजून टप्पोर मोगरा माळायचा हव्यास करत्येस कां तूं ?

*

# गाणे

(१)

सांज उतरून यायची झाडांच्यात पेरीत
सोनेरी फुलांचं चांदणं
आणि पाखरं, गाऊ लागायची संध्यासूक्त.
त्यावेळी आपण डोळ्यातून ओसंडलो होतो एकमेकांवर
आणि आसवांची झाली होती गाणी.
शेवटच्या संधिप्रकाशात विरघळत गेलो होतो
आपण कणाकणाने तेव्हा पाखरांनी आपल्या साठीही
गाईलं होतं हिरवं सूक्त, प्रेमाचं!

(२)

आता हिरव्याकंच पानांना गळती लागली आहे
हे ही तुला सांगायला हवं कां?
सखये, शिशिर रक्तात सुरू आहे.
आणि ह्या ओठातून फुटत नाही एकही कोवळं गाणं
अथवा डोळ्यातून झरत नाही, दुबळं पाणी
यापुढे ओसाड रानात पाखरं येतील विसाव्याला
हे तूं विसरून जा.
एकदा माझ्या पावलां खालचे वणवे पाहून जा.

# भैरवी

माझे सारेच उत्सव
वादळात उधळून गेले

मी जत्रेत हरवलेल्या मुलासारखा
अश्रू भरलेल्या डोळ्यांनी
शोधीत राहिलो माझे घर.
उसासत, धपापत, उरी फुटत.

आता तरी मैफिल संपविताना
तू भैरवी गाऊ नकोस.
माझ्यासाठी. . . . .

# पडदा

पड्याआड काहीही असू शकेल.
कदाचित तू आपले कपडे बदलीत असशील,
अथवा एखाद्या नाटकाचं सेटिंग लावलं जात असेल.

पड्यावर महिषासूर मर्दिनीचं आक्रमक चित्र !
रक्तरंजित सुरा.
महिषासूरानं जिवाच्या करारानं केलेली अपेशी लढाई.

जरीच्या वेलबुट्टीत मढवलेली पड्याची किनार,
पड्याआड एखादे वेळी वयात आलेल्या नाटकातील
संभोग दृश्याची खरीखुरी तालीम.

पड्याआड आपल्या दहाबाय दहाच्या खोलीत मी
रागावल्यानंतर तूं रडत असतेस हे सुद्धा खरेंच
पड्याआडचं आपल्याला उशीरा समजतं हे खूप बरं.

त्यामुळे आपण सुखी आहोत.
पडदा : सगळ्यांनाच योग्यवेळी प्रेक्षकांसमोर
उभा करणारा समर्थ सूत्रधार.

## घटना

झाडांनी आपली वसाहत करण्याचे ठरविले.
वसाहत करताना काही नियम ठरले.

नियम : "प्रत्येक झाडाने आपल्या बळावर
घट्ट मुळे रोवून उभे राहायचे.

आपला विस्तार करतांना कोणावरही
अतिक्रमण करायचे नाही.

आपल्या सावलीला कोणीही उभे राहिले
तरी नाही म्हणायचे नाही.

कोणालाही ओरबाडू द्यायची आपली पाने, फुले.
पाखरांच्या घरट्यासाठी फांद्या मोकळ्या ठेवायच्या.

वादळात सगळ्यांनी एकमेकांना सावरून धरायचे"
सुरुवातीला सारे काही नियमानुसार चालले.

नंतर काही झाडांनी आपल्या ढोलीत
सापांनाही आश्रय दिला.

विस्तार वाढवताना मोठ्या झाडांनी
छोट्या झाडांना आपल्या बगलेत दाबले.

वादळात उन्मळून पडताना दुसऱ्या झाडाला घेऊनच
कोसळायचे हा नवा अलिखित नियम ठरून गेला.

आता मूळ घटनेच्या शोधात पक्षी फिरताहेत
ह्या झाडांवरून त्या झाडावर.

# हार – जीत

खेळातील हार-जीत मनावर घ्यायची नसते
खेळ सुरु होण्यापूर्वी तूं मला ऐकवतेस.

पटावरच्या चौसष्ट घरांपैकी
तुझी अर्धी, माझी अर्धी.

उरलेल्या बत्तीस घरांवर राज्य कुणी करायचे
हा वादाचा मुद्दा.

दोघांचेही राजे समोरासमोर
नजरेला नजर देत उभे.

अवती भवती हत्ती, घोडे,
उंट, वजीर आणि प्यादी.

डावाला प्रारंभ.
हळू हळू माझे हत्ती, घोडे,

उंट, प्यादी पटाच्या बाहेर
अखेरचा घाव वजीरावर.

युद्ध हरल्याची घोषणा
माझी मनातल्या मनात.

नंतर तूं मला खेळवीत राहातेस
उंदराला मांजराने खेळवावे तसे.

डाव संपवून आपण उठतो.
दुसरा डाव खेळण्यासाठीच.

प्रत्येक डाव सुरू होण्यापूर्वी
तूं मला ऐकवतेस.

"खेळातील हार-जीत
मनावर घ्यायची नसते रे."

*

# फितूर

अेके दिवशी.....
गजबजलेले रस्त्ये ओस पडले.

बहरलेली झाडे मुकाट झाली
आणि तिच्या डोळ्यात झडीचा पाऊस सुरू झाला.

तेव्हा पासून ढगात दबा धरुन बसलेले डोंगर
फितूर आहेत तिच्या डोळ्यांना.

आभाळही झुकलेले दिसले तिच्या बाजूने.
या पुढे कसलाच भरवसा देता येणार नाही.

कारण:
माझेच डोळे फितूर होत आहेत.
झडीच्या पावसाला.

# बेवारशी

जुन्या पुराण्या पुस्तकासारखे
आयुष्य जीर्ण होऊन गेले आहे.

कुणी आसुसून उराशी कवटाळावे अशी नवलाई
असे देखणेपण उरले नाही ह्या आयुष्यात.

पुस्तकाची काढता येते नवी आवृत्ती पण
ह्या देहाची नवी आवृत्ती नाही काढता येत.

हे बोचरेपण मरेपर्यंत कवटाळायचे उराशी
आणि एखाद्या वळणावर व्हायचे बेवारशी.

# कुंपण

मोर नाचतो नाचतो माझ्या कधीचा ग दारी
शेत पिकाला ग आलं गुरं छळतात भारी.

गेला कोसळूनी सारा आसमंत बाई उभा
पिवळ्या केतकिची शोभा लख्ख माझ्या तनुवरी.

झोप दिस-रात नाही डोळा चातकाची तहान
लोंब वाकला भारानं चंद्र फुले ओठावरी.

आलं मोडाया कुंपण कशी करावी राखण
साऱ्या पिकातूनी उठे आता गोड शिरशिरी.

REFBK-0024941
REFBK-0024941

# परिचय



भाऊ विशे

कवितेचे उदंड पीक येण्याच्या या काळामध्ये निष्ठेने आणि प्रामाणिकपणे कवितालेखन करणारे जे थोडके कवी आज लिहीत आहेत त्यांमध्ये **भाऊ विशे** यांचे नाव प्रकर्षाने घेतले जावे. '**विफलता**' हा या शतकाचा स्थायीभावच आहे. या विफलतेची चित्रे भाऊ विशे यांच्या काव्यशैलीने प्रत्ययकारी रीतीने टिपली आहेत. 'निर्वासित' या नावावरुनच हे स्पष्ट व्हावे. या कवितांमध्ये प्रामुख्याने कवीने प्रेमानुभवाची चित्रे रंगविली आहेत. हे प्रेमानुभव प्रीतीसाफल्याचे नसून करुणेच्या पटलामध्ये बंदिस्त झालेल्या प्रेमभ्रमराचे आहेत. हे प्रेमानुभव धुंद गुलाबाच्या मांडवावर बरसणाऱ्या मधाच्या चांदण्याचे नसून चांदण्याच्या आगीत एकाकी भ्रमणाऱ्या निर्वासित पाखरांचे आहेत. भाऊ विशे यांची काव्य जाणीव मुख्यतः प्रतिमांच्या भाषेतून जरी व्यक्त होत असली तरी अप्रयोजक, असंबद्ध प्रतिमांचा सोस तिला नाही. त्यांच्या कवितेतील प्रतिमा या आशयघन, उत्कट व प्रत्ययकारी आहेत. या काव्यप्रवासात कवीला पुढचे 'अरुपाचे रुप' दिसो ही शुभेच्छा.

—**अशोक बागवे**

---

**नयना पब्लिकेशन**

जी/५, नटराज सोसायटी, नौपाडा-ठाणे ४०० ६०२.

फोन ५०५१६६